महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्‌ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ६० वा | सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# फडणवीस, निवडणूक आयोगाची दलाली बंद करा

## हर्षवर्धन सपकाळ यांनी फटकारले

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी 2 ऑक्टोबर रोजी विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला 100 वर्ष पूर्ण होत असून हा नियतीचा एक संकेत आहे. 100 वर्ष पूर्ण करणाऱ्या रा. स्व संघाने आता विखारी विचार सोडून समता, बंधुता व सामाजिक न्यायाचे संविधान व गांधी विचार स्विकारावे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील निशाणा साधला. फडणवीस, निवडणूक आयोगाची दलाली बंद करा; अशा शब्दात फटकारले आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भारताचे संविधान ही ऐतिहासिक घटना असून संविधान भारताची प्रेरणा आहे. संविधान हे मनुस्मृतीवर आधारीत असावे अशी रा. स्व. संघाची अपेक्षा होती, गोलवलकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तसे पत्र पाठवले होते. पण आम्ही विशिष्ट लोक हा संघाचा विचार आहे तर संविधानाचा विचार हा आम्ही भारताचे लोक असा आहे. संविधान नाकारणारा विचार भाजपाचा आहे. स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्ष रा. स्व. संघाने त्यांच्या कार्यालयावर राष्ट्रध्वज तिरंगा सुद्धा फडकवला नव्हता. आता शंभर वर्ष होताना संघाने



विखारी व विषारी विचार सोडून संविधानाचा विचार स्विकारला पाहिजे असे सपकाळ म्हणाले.



काँग्रेस पक्षाची नेहमीच संविधान रक्षणाची भूमिका राहिली आहे. महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या पुढाकाराने 28 सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान संविधान सत्याग्रह यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा नागपूरच्या दिक्षाभूमीपासून सुरु होऊन सेवाग्रामपर्यंत जाणार आहे. 28 तारखेला महान क्रांतीकारी भगतसिंह यांच्या बलिदानदिनी मशाल मोर्चा काढला जाणार आहे तसेच नागपूरच्या संविधान चौकात एका सभेचे आयोजन करण्यात आले आहे. 29 तारखेपासून यात्रेला सुरुवात होणार आहे. यावेळी रा. स्व. संघाला संविधान भेट देणार असल्याचेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

### फडणवीस, निवडणूक आयोगाची दलाली बंद करा

एका प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरी झाल्याचे पुरावे दिले आहेत, मुख्यमंत्री फडणवीसांकडे गृहमंत्रालयही आहे, त्यांच्या पोलिसांनी राजुरा विधान सभेतील मतचोरी प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे तरिही देवेंद्र फडणवीस हे निवडणूक आयोगाची दलाली करत आहेत, त्यांनी ही दलाली बंद करावी. देवेंद्र फडणवीस हे चोर मुख्यमंत्री आहेत, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याबद्दल भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या विधानावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, पूर्वी सुसंस्कृत, सभ्य, विचारवंत व कवी पदरी असायचे पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही नालायक व विकृत लोक पदरी ठेवले आहेत. जयंत पाटील यांच्याबद्दल केलेले विधान हे बेलगामपणाचा कळस असून फडणवीस हे लाचार व अधर्मी मुख्यमंत्री आहेत असे सपकाळ म्हणाले.

**पनवेलच्या भाजपा नगरसेवकांचा काँग्रेसमध्ये प्रवेश**

पनवेल महानगरपालिकेतील भाजपाचे नगरसेवक हरिश केणी, रविकांत म्हात्रे, कैलास घरत यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. सपकाळ यांनी या सर्वांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले.

**काँग्रेस तालुकाध्यक्ष पदासाठी मुलाखती**

टिळक भवन दादर येथे काँग्रेस तालुकाध्यक्ष पदासाठी निरीक्षकांनी शिफारस केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य खासदार चंद्रकांत हांडोरे, नसीम खान, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, यु. बी. व्यंकटेश, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड गणेश पाटील उपस्थित होते.

## सोलापूर जिल्ह्यात महाराष्ट्रातील पहिली महिला बचाव टीम सक्रिय

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सातत्याने निर्माण होणाऱ्या आपत्तीजनक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती काळात तातडीच्या बचाव कार्यासाठी प्रशिक्षित पथकाची आवश्यकता लक्षात घेऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने ह्यआपदा मित्र सखीह्व टीम सोलापूर जिल्ह्यात तयार करण्यात आली आहे. ही कार्यरत असलेली महाराष्ट्रातील पहिली महिला आपदा बचाव टीम असून, त्यांना अद्ययावत प्रशिक्षण देण्याचा



उपक्रम सध्या सुरू आहे.

या प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून बोट चालवण्याचा विशेष सराव शिबिर शनिवार, दिनांक २० सप्टेंबर रोजी हिप्परगा तलाव परिसरात आयोजित करण्यात आले. शिबिराचे आयोजन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग व उत्तर सोलापूर तालुका तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

शिबिरास निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन प्रशिक्षणाची पाहणी केली व उपस्थित आपदा सखींच्या कायार्ची प्रशंसा केली. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथकाचे अनिल सल्ले व नवनाथ गेजगे उपस्थित होते.

या शिबिरात १५ आपदा मित्र सखी सहभागी झाल्या असून, त्यांनी बोट फिटिंग, बोट चालवण्याचे तंत्र, जलवाहन वापर, पुरात अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्याचे उपाय, दम लागल्यास श्वसन नियंत्रण यांसारख्या महत्त्वाच्या बाबींचा सराव केला.

## नवरात्र उत्सवात डॉल्बी, डि.जे. व लेझर लाईट वापरास बंदी : जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात दिनांक २२ सप्टेंबर २०२५ ते ०७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पारंपरिक पद्धतीने व उत्साहात साजरा होणाऱ्या नवरात्र उत्सवाच्या मिरवणुकांमध्ये डॉल्बी, डि.जे. सिस्टीम व लेझर लाईट शोच्या वापरास प्रतिबंध घालण्यात आला आहे. जिल्ह्याचे जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३(१) अन्वये हा आदेश जारी केला आहे.



मागील वर्षी सार्वजनिक शक्तीदेवी उत्सव मंडळ व गरबा- दांडिया आयोजक मंडळाकडून आयोजित कार्यक्रमांमध्ये डॉल्बी व डि.जे. सिस्टीममुळे काही भाविकांना कान व छातीच्या त्रासामुळे अपंगत्व किंवा जीवितास धोका निर्माण झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली होती. तसेच लेझर लाईटमुळे वयोवृद्ध व लहान मुलांच्या डोळ्यांना इजा झाल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

या संदर्भात ज्येष्ठ नागरिक संघटनांनी निवेदन सादर केले असून, उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. १ यांनी दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजीचा अहवाल सादर केला आहे. त्यानुसार, सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने डॉल्बी, डि.जे. व लेझर लाईटच्या वापरास प्रतिबंध करणे आवश्यक असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## पुण्यात Ph.D. विद्यार्थ्यांचे आंदोलन : रोहीत पवारांचे सरकारवर टीकास्त्र

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** सारथी, बार्टी आणि महाज्योती या संस्थांमार्फत फेलोशिपची जाहिरात तातडीने काढावी, तसेच विद्यार्थ्यांना वेळेवर फेलोशिप मिळावी, या प्रमुख मागण्यांसह गेल्या आठवड्यापासून पुण्यात Ph.D. विद्यार्थी आंदोलन करत आहेत. या आंदोलकांची आज आमदार रोहीत पवार यांनी भेट घेऊन त्यांच्या मागण्यांची माहिती घेतली.

**आंदोलक विद्यार्थ्याची तब्येत बिघडली**

आंदोलनादरम्यान एका विद्यार्थ्याची तब्येत बिघडल्याने त्याला तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. विशेष



म्हणजे अतिवृष्टीमुळे त्याच्या शेतातील सोयाबीन पूर्णपणे पाण्यात गेले आहे. 'एकीकडे अस्मानी संकट आणि दुसरीकडे सरकारचे सुलतानी संकट यामध्ये विद्यार्थी अक्षरशः भरडला जातोय', अशी टीका पवारांनी केली.

**सरकारकडून ढिम्म प्रतिसाद**

विद्यार्थ्यांच्या रास्त मागण्यांकडे सरकारने अजूनही गांभीर्याने लक्ष दिले नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे रोहीत पवार यांनी ठासून सांगितले. 'फेलोशिपच्या जाहिराती आणि वितरणामध्ये सरकार जाणीवपूर्वक विलंब करते आहे. विद्यार्थ्यांना आश्वासनांवर ठेवून त्यांचे भवितव्य धोक्यात घालण्याचे पाप सुरू आह', असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

चंद्रकांत पाटील यांच्याशी संपर्क

या पार्श्वभूमीवर पवारांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली. 'याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी वेळ दिला आहे. उशिरा का होईना सरकारने दखल घेतली, त्यांचे आभार; पण फक्त चर्चा करून उपयोग नाही, ठोस निर्णय होणे गरजेचे आहे', असे मत त्यांनी व्यक्त केले.

**विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठाम**

'आज आंदोलन करणारे विद्यार्थी हेच भविष्यातील संशोधक आणि शास्त्रज्ञ आहेत. सरकारने त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे राज्याच्या भविष्यातील प्रगतीकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे. आम्ही मात्र या विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे आहोत', असा इशाराही रोहीत पवार यांनी दिला.

## मराठा योद्धा पाटलांचा धनगर आरक्षणाला पाठिंबा

**जालना (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजाचे नेते व आंदोलनकर्ते मनोज दादा जरांगे पाटील यांनी आज धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी त्यांनी धनगर समाजाच्या लढ्यात मराठा समाज खांद्याला खांदा लावून उभा राहील, असे स्पष्ट केले.

जालना येथे धनगर समाजाचे मल्हार योद्धा दीपक भाऊ बोराडे हे उपोषणाला बसले असून, त्यांच्याशी मनोज दादा यांनी दूरध्वनीवरून चर्चा केली. यावेळी दादांनी त्यांची तब्येत सांभाळण्याचा सल्ला देत 24 तारखेला मराठा समाज मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होईल, अशी ग्वाही दिली.

आंतरवाली येथे धनगर समाजाच्या प्रतिनिधींनी मनोज दादा यांची भेट घेतली. या भेटीत दादांनी मराठा समाज आणि धनगर



समाज हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे सांगितले. "धनगर समाजाला जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत आम्हीही शांत बसणार नाही. आम्ही तुमच्या सोबत आहोत," असे ठाम आश्वासन दादांनी दिले.

या वेळी यशवंत संघर्ष सेनेचे संस्थापक विष्णू कुऱ्हाडे, देवाभाऊ मंडलिक, रामराव दादा कोल्हे, भगवानदादा भोजने आणि शिवाजीराव दादा गावडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अ‍ॅण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ताः गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा वज्रनिर्धार

### भाजपला पराभूत करण्यासाठी एकजूट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** देशात सध्या सत्तेवर असलेल्या भाजपा प्रणीत मोदी सरकारने जनतेला खोट्या आश्वासनांची खैरात वाटली असून, महत्त्वाच्या जीवनावश्यक प्रश्नांकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे. जाहिरातबाज व घोटाळेबाज धोरणांनी जनतेला हवालदिल करून टाकले आहे. या सरकारला धुळीस मिळवण्यासाठी स्थानिक पातळीवरूनच लढा सुरू करावा लागणार असल्याचा निर्धार महाविकास आघाडीने केला आहे.

याच पार्श्वभूमीवर आगामी सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष एकजुटीने लढण्याचा वज्रनिर्धार व्यक्त करण्यात आला. याबाबतची माहिती ज्येष्ठ नेते व माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांनी दिली.

आज सोलापूर येथील लोटस हॉटेलमध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या पुढाकारातून



ज्येष्ठ नेते माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांच्या अध्यक्षतेखाली आघाडीची महत्त्वाची बैठक पार पडली. बैठकीच्या प्रारंभी अलीकडेच निधन झालेल्या माजी आमदार निर्मलाताई ठोकळ यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर निवडणूक तयारीवर सविस्तर चर्चा झाली. महाविकास आघाडीने ह्लुटो, बाटो आणि खाओह्व या धोरणावर चालणाऱ्या भाजपला सोलापूरच्या जनतेसमोर उघडे पाडून आगामी निवडणुकीत भुईसपाट करण्याचा निर्धार व्यक्त केला.

बैठकीस काँग्रेस शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, माजी महापौर संजय हेमगड्डी, प्रवक्ते अशोक निंबर्गी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सुधीर खरटमल, माजी महापौर नलिनीताई चंदेले, माजी अध्यक्ष भारत जाधव, शिवसेना जिल्हाप्रमुख अजय दासरी, जिल्हा उपप्रमुख प्रताप चव्हाण, दत्ता गणेशकर, शहर प्रमुख महेश धाराशिवकर, नाना मोरे, भारताचा कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी चे जिल्हा सचिव युसुफ शेख मेजर मा. नगरसेविका नसीमा शेख, नलिनीताई कलबुर्गी, ॲड.अनिल वासम, साथी दत्ता चव्हाण, तिरुपती परकीपंडला, चंद्रकांत पवार, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देशभरात आजपासून जीएसटीचे नवी कररचना

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** देशभरात जीएसटीची नवी कर रचना लागू होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संध्याकाळी पाच वाजता संपूर्ण देशाला संबोधित केलं. यावेळी नरेंद्र मोदी यांनी आजपासून म्हणजेच नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून जीएसटीची नवी कररचान लागू होणार असल्याची माहिती दिली.

आता केवळ 5 आणि 18 टक्के एसटी लागू राहणार असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. या नव्या कर रचनेमुळे देशातील नागरिकांची मोठी बचत होणार आहे. अनेक जीवनाश्यक वस्तूंवर आता जीएसटी लागणार नाही. तर काहींवर केवळ 5 टक्के जीएसटी लागणार आहे. त्यामुळे अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत. उद्यापासून नेमक्या कोणकोणत्या वस्तू स्वस्त होणार आहेत, याची सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



जीएसटीच्या नव्या कर रचनेनुसार, टुथपेस्ट, साबन आणि शॅम्प्यू स्वस्त होणार आहे. या वस्तूंवर आधी 12 टक्के जीएसटी लागायचा. आता केवळ 5 टक्के जीएसटी लागणार आहे.

नव्या जीएसटी रचनेनुसार, पॅकेज फुड्स जसे की बिस्किट, स्नॅक्स आणि जूस स्वस्त होणार आहेत. या वस्तूंवर आता केवळ 5 टक्के कर लागणार आहे. तसेच डेअरी उत्पादक तूप आणि कंडेंस्ड मिल्क स्वस्त होणार आहे. याशिवाय सायकल, स्टेशनरी वस्तूदेखील स्वस्त होणार आहेत. तसेच निश्चित किंमतीपर्यतचे कपडे आणि बूट स्वस्त होणार आहेत.

## संपादकीय

# यंदाचा हंगाम तरी सुखाचा?

राज्यातील साखर उद्योग हा आर्थिक तसेच राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य मंत्रिमंडळ व आमदारांपैकी निम्म्याहून अधिक लोक साखर कारखान्यांशी संबंधित आहेत. मात्र राज्यात या उद्योगातील ऊसतोडणी व वाहतूक कामगार हे सर्वात तळातील उपेक्षित कामगार राहिले आहेत. मराठवाड्यातील सर्व जिल्हे, धुळे, नंदुरबार, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, विदर्भातील काही जिल्हे, पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांतील काही तालुक्यांतून हे कामगार ऊसतोडीच्या कामावर जातात. उत्तर महाराष्ट्रातील कामगार गुजरातला, तर मराठवाड्यातील कामगार कर्नाटकात स्थलांतर करतात. काहीजण आंध्र प्रदेश, तेलंगण व तामिळनाडू या राज्यांतही स्थलांतरित होतात. गळीत हंगामात चार–पाच महिन्यांच्या काळासाठी आपला सर्व प्रपंच मूलबाळ,जनावरं असे सर्व चंबुगबाळ घेऊन साखर कारखान्यांकडे स्थलांतर करतात. स्थलांतर केलेल्या प्रदेशातील लोक सर्वसाधारणपणे त्यांना गबाळे असे संबोधतात. या कामगारांची तिसरी पिढी आता ऊसतोडणीचे काम करीत आहे. यामध्ये सर्व जाती धर्मातील स्त्री–पुरुषांचा समावेश असला तरी दलित, वंजारी, आदिवासी, अल्पसंख्यांक व भूमिहीन मराठा, ओबीसी समाजातील लोकांचा भरणा अधिक आहे. या कामगारांना निम्म्या स्त्रिया आहेत. ऊन, वारा, पाऊस, थंडीत रात्रंदिवस काम करावे लागते. किमान वेतन नाही, सामाजिक सुरक्षितता, सुविधा नाही, आरोग्यविषयक सुविधा, शुद्ध पिण्याचे पाणी नाही, अशा स्थितीत त्यांना काम करावे लागते. साखर कारखाना व अधिकारी यांच्यापैकी बहुतेकांचा या कामगारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक व हेटाळणीचा असतो. आतापर्यंतच्या राज्य सरकारांचा दृष्टिकोनही तसाच राहिला आहे. त्यामुळे या कामगारांना आपल्या मजुरीत वाढ व्हावी म्हणून संघर्ष करावा लागतो. अशा संघर्षातून राज्य सरकारने दादासाहेब रूपवते यांच्या अध्यक्षतेखाली कामगारांच्या एकूण परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली होती. त्या समितीने प्रदीर्घ अभ्यास दौरे करून कारखाने व कामगार यांच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा करून आपला अहवाल सादर केला. ३२ वर्षांपूर्वी आलेल्या या अहवालामध्ये या कामगारांच्यासाठी माथाडी धरतीवर कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती, जी तत्कालीन राज्य सरकारने नाकारली होती. तेव्हा हे कामगार पुरेसे जागृत व संघटित नव्हते. कामगारांनी राज्यभरात आंदोलन सुरू केले तेव्हा २००२ मध्ये संपाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पुन्हा एक अभ्यास समिती (दौंड समिती) नेमली. तिने राज्यभर दौरे करून २००५ मध्ये आपला अहवाल सादर केला. ज्यामध्ये प्रामुख्याने कल्याणकारी महामंडळ स्थापन करावे आणि त्यासाठी साखर कारखान्यांकडून २५ टक्के लेव्ही ऊसतोडणी व वाहतूक खचापीटी घ्यावी, अशी शिफारस केली होती. त्याला साखर कारखान्यांनी जोरदार विरोध केला.


२०१४ मध्ये महायुती सरकारने गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ स्थापन केल्याचे जाहीर केले. परंतु, प्रत्यक्षात पाच वर्षांत काहीही झालेले नाही. ऊसतोडणी वाहतूक कामगारांना माथाडी बोर्डात समाविष्ट केल्याचे सरकारने परिपत्रक काढले, पण कार्यवाही शून्य होती. २७ ऑक्टोबर २०२० रोजी या कामगारांची मजुरी वाढवण्यासंबंधी झालेल्या त्रिपक्षीय बैठकीत गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय पुन्हा घेण्यात आला. करोना महामारीच्या काळात महामंडळाचे काम रेंगाळले. महाविकास आघाडीने २०२१–२२ पासून सर्व साखर कारखान्यांनी दरवर्षी प्रतिटन

दहा रुपये इतका निधी महामंडळाकडे भरावा आणि सरकारनेही तेवढाच निधी दरवर्षी महामंडळाला द्यावा, असे परिपत्रक काढण्यात आले. ३ एप्रिल २०२२ रोजी महामंडळाच्या राज्य कार्यालयाचे पुणे येथे मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. २०२२ –२३ चा हंगाम सुरू होईपर्यंत राज्यातील सर्व ऊसतोडणी व वाहतूक कामगारांची नोंदणी करण्यात येईल आणि त्यांना महामंडळाची ओळखपत्रे देण्यात येतील, असे जाहीर झाले, ऊसतोडणी कामगारांची नोंदणी करण्याची जबाबदारी ग्रामसेवकाकडे सोपविण्यात आली. दरम्यान राज्यात सत्तांतर झाले. ग्रामसेवकांच्या संघटनेने हे काम करण्यास नकार दिला आणि नव्याने सत्तेवर आलेल्या सरकारने दीड वर्षांत याकडे फारसे लक्ष दिले नाही. दरम्यान प्रतिटन दहा रुपये निधी देण्यास साखर कारखान्यांनी नकारघंटा वाजवीत सन २०२१–२२ मध्ये निधी दिला नाही. त्या विरोधात सिटू संघटनेने आंदोलन पुकारले. साखर कारखान्यांचा गाळप परवाना रोखण्याची आग्रही मागणी केली. तेव्हा गेल्या तीन हंगामात साखर कारखान्यांनी पूर्ण निधी न देता तीन रुपये प्रतिटन असे तीन हप्ते आतापर्यंत दिले आहेत. राज्य सरकारनेही आपला निधी पूर्णपणे दिलेला नाही. सरकारच निधी देण्याबाबत दोषी असल्याने ते साखर कारखान्यांना दरडावून सांगण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

दरम्यानच्या काळात एक चांगली गोष्ट घडली. एका आघाडीच्या वृत्तपत्रात ऊसतोडणी, विशेषतः महिला मजुरांच्या शोषणाबद्दल एक विदारक सत्य मांडणारा लेख प्रसिद्ध झाला. मुंबई उच्च न्यायालयाने २०२३ मध्ये या कामगारांच्या प्रश्नाबद्दल एक सुओ मोटो रिट पिटीशन दाखल करून घेतली. त्यामुळे राज्य सरकार, संबंधित अधिकारी, साखर कारखाने हे सर्व जरा गांभीर्याने ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांकडे बघू लागले. त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काहीतरी झाल्याचे दिसू लागले. ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या वतीने काही वसतिगृहे सुरू करण्यात आली आणि गेल्या वर्षी अपघात उपदान योजना सुरू केली. अपघाती मृत्यू झालेल्या कामगारांच्या वारसांना पाच लाख रुपयांची मदत आणि जखमी झाल्यास ५० हजारांपर्यंतचा औषध उपचारांचा खर्च, तसेच बैल निकामी किंवा मरण पावल्यास ५० हजार रुपयांची मदत दिली जाते. गेल्या हंगामात अनेक जिल्ह्यांतील कामगारांना या योजनेचा लाभ मिळाला. परंतु, यामध्ये नैसर्गिक मृत्यू झाल्यास मदत दिली जात नाही. अशुद्ध पाण्यामुळे होणारे पोटाचे विकार, आतिश्रमामुळे हार्ट अटॅक यांसारख्या प्रकरणांमध्ये मदत देण्याची गरज आहे.

उच्च न्यायालयाने एप्रिल २०२५ मध्ये या कामगारांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी २७ महत्त्वाच्या शिफारशी केलेली असून ऑक्टोबर २०२५ पासून त्यांची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. स्थलांतरित कामगारांसाठी सुरक्षित निवास, पिण्याचे शुद्ध पाणी, लाईट गॅस कामगारांची नोंदणी करून ओळखपत्र देण्यास मदत करणे, मुलामुलींच्या शिक्षणाची व्यवस्था, आरोग्य सुविधा, सामाजिक सुरक्षितता, वसतिगृहे इत्यादी प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यास सांगितले आहे. जे साखर कारखाने या सुविधा देणार नाहीत किंवा टाळाटाळ करतील, त्यांचे गाळप परवाने निलंबित करणे, रद्द करणे यांसारख्या कठोर शिफारशी न्यायालयाने केल्या आहेत. राज्य सरकारने या शिफारशी लागू करण्यासाठी एक राज्यस्तरीय समिती गठीत केलेली असून सर्व प्रमुख जिल्ह्यांतही अशा समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. त्यामुळे ऊसतोडणी व वाहतूक कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी निर्णयांच्या पातळीवर सर्व गोष्टी झालेल्या आहेत, पण प्रश्न आहे तो साखर कारखान्यांनी प्रामाणिकपणे या सर्व शिफारशी लागू करण्याचा. शासकीय अधिकारी, महामंडळाचे पदाधिकारी आणि या कामगारांच्या सजग संघटना किती गांभीर्याने काम करतात, त्यावर या कामगारांच्या प्रश्नांवर कितपत मार्ग निघतो, हे अवलंबून आहे. सन २०२५–२६ चा गळीत हंगाम महिना–दीड महिन्यात सुरू होत आहे. येत्या हंगामात कामगारांना त्यांच्या आयुष्यात आशेचे किरण उगवण्याची आशा आहे, पाहू या काय होते..

# कर्मवीर भाऊराव पाटील : शिक्षण, सामाजिक समता आणि परिवर्तनाचा दीपस्तंभ



भारतीय समाजात विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विषमता अत्यंत तीव्र होती. जातपात, अंधश्रद्धा, अज्ञान आणि गरिबी यामुळे समाजातील बहुसंख्य जनतेला शिक्षण व प्रगतीपासून दूर ठेवण्यात आले होते. अशा अंधाऱ्या वातावरणात काही थोर समाजपुरुषांनी आपल्या कार्याने सामान्य माणसाला नवा मार्ग दाखविला. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, संत एकनाथ, महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे या परंपरेतच पुढे कार्य केलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी आयुष्यभर सामान्य शेतकरी, मजूर, गरीब, वंचित आणि बहुजन समाजातील मुलामुलींना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष केला आहे. त्यांच्या शिक्षण चळवळीमुळे ग्रामीण महाराष्ट्रातील समाजजीवनात एक नवी क्रांती घडली आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर संस्थानातील हातकणंगले तालुक्यातील कुंभोज या खेडेगावात झाला. शेतकरी कुटुंबात ते वाढले. घरची परिस्थिती गरिबीची होती. लहानपणीच त्यांनी शेतात बैल हाकणे, गुरे राखणे यासारखी कामे केली. परंतु त्यांच्यातील ज्ञानलालसा प्रखर होती. त्यांनी प्राथमिक शिक्षण गावात घेतले आणि पुढे सातारा व कोल्हापूर येथे शिक्षणासाठी गेले. कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज हे त्यांच्या आयुष्याचे प्रेरणास्थान ठरले. शाहू महाराजांनी शूद्र–अतिशूद्रांना शिक्षणाची दारे खुली केली होती, अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला होता. या विचारांचा खोल ठसा भाऊराव पाटील यांच्या मनावर बसला. 'शिक्षण हेच खरे मुक्तीचे साधन आहे' हा विश्वास त्यांनी मनाशी पक्का केला होता. भाऊराव पाटील यांनी शिक्षक म्हणून आपली कारकीर्द सुरू केली. परंतु लवकरच त्यांना जाणवले की केवळ अध्यापन पुरेसे नाही, तर गरीब मुलांना शिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर संस्थात्मक प्रयत्न करणे आवश्यक आहे. म्हणूनच १९१९ साली त्यांनी 'रयत शिक्षण संस्था'ची स्थापना केली. या संस्थेचा मूलमंत्र होता 'शिक्षण सर्वांसाठी, विशेषतः गरीब व वंचितांसाठी.' त्यांनी ठामपणे सांगितले की शेतकरी आणि कामगार यांच्या मुलांना शिक्षणाशिवाय अन्य कोणताही मुक्तीचा मार्ग नाही. या विचारातूनच रयत शिक्षण संस्थेची उभारणी झाली.

रयत शिक्षण संस्थेने सुरुवातीला फार मोठ्या प्रमाणावर साधनसंपत्ती नव्हती. भाऊराव पाटील स्वतः गावोगावी फिरून निधी मागत. लोकांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत. अनेक वेळा त्यांना अपमान सहन करावा लागला आहे, परंतु त्यांनी हार मानली नाही. 'शेतकऱ्याच्या घरात दिवा लावण्यासाठी माझ्या अंगावरचा झगा विकावा लागला तरी चालेल' अशी त्यांची तयारी होती. त्यांच्या या ध्येयवेडेपणामुळे

वापरत. यातून विद्यार्थ्यांमध्ये कष्टाची तयारी, स्वावलंबनाची जाणीव आणि श्रमाची प्रतिष्ठा ही मूल्ये रुजली जात होती. शिक्षण म्हणजे केवळ पैशाच्या जोरावर मिळणारे साधन नाही, तर श्रमाच्या मोबदल्यात मिळणारे पवित्र फलित आहे, ही जाणीव विद्यार्थ्यांना झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा दृष्टीकोन केवळ शिक्षणपुरता मर्यादित नव्हता. ते शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानत असत. त्यांच्या मते, शिक्षण घेतलेला विद्यार्थी समाजासाठी काम करणारा असावा. शेतकरी, कामगार, कष्टकरी यांच्या समस्या ओळखून त्यांच्यासाठी आवाज उठविणारा असावा. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यावर भर दिला. त्यांच्या शाळांतून घडलेल्या विद्यार्थ्यांनी नंतर समाजकारण, राजकारण, साहित्य, पत्रकारिता, विज्ञान आदी क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यात स्त्रीशिक्षणाला विशेष महत्त्व होते. त्या काळात मुलींना शाळेत पाठविणे लाजिरवाणे समजले जात असे. परंतु भाऊराव पाटील यांनी समाजाच्या या चुकीच्या मानसिकतेला आव्हान दिले. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्या, वसतिगृहे उभारली. स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाची प्रगती शक्य नाही, हा त्यांचा ठाम विश्वास होता. या विचारामुळेच पुढे ग्रामीण भागातील मुलींनाही शिक्षणाची संधी मिळाली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा प्रभाव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला नाही तर भारतभर पसरलेला आहे. आज या रयत शिक्षण संस्थेच्या शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, कृषी शिक्षण केंद्रे, व्यावसायिक शिक्षण संस्था अशा विविध शाखांतून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या शैक्षणिक चळवळीने गरीबांना ज्ञानप्रकाश दिला आणि समाजातील विषमता कमी करण्याचे कार्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यात आपल्याला महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा संगम दिसतो. फुले यांनी अस्पृश्यता व अज्ञानाविरुद्ध सुरू केलेली लढाई, शाहू महाराजांनी दिलेला सामाजिक न्यायाचा मंत्र, गांधीजींनी दिलेली श्रमप्रतिष्ठेची शिकवण आणि डॉ. आंबेडकरांचे समतेचे तत्त्वज्ञान हे सर्व भाऊराव पाटील यांच्या कार्यातून प्रत्यक्ष साकार झाले. म्हणूनच त्यांना खऱ्या अर्थाने 'कर्मवीर' ही पदवी बहाल झाली. त्यांच्या जीवनात अनेक अडचणी आल्या. आर्थिक संकटे, समाजातील प्रतिकार, रूढीपरंपरा, उपेक्षा यांनी त्यांना थांबवले नाही. अनेकदा त्यांना अपमान सोसावा लागला, परंतु त्यांनी आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. ते म्हणत, 'मी अपयशी झालो तरी चालेल, पण प्रयत्न सोडणार नाही.' त्यांच्या चिकाटीमुळे आज त्यांच्या कार्याचे भव्य रूप महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत दिसते.

आज आपण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याकडे पाहतो तेव्हा जाणवते की त्यांनी घडविलेली चळवळ ही केवळ शिक्षणाची चळवळ नव्हती, तर ती सामाजिक समतेची चळवळ होती. त्यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाशी जोडले. त्यांनी गरीबांच्या मुलांना शिक्षण देऊन त्यांना आत्मभान दिले. त्यांना समाजात आपले स्थान आहे, आपली किंमत आहे, हे पटवून दिले. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी समाजातील विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला.

आजच्या काळात त्यांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. कारण आजही ग्रामीण भागात शिक्षणापासून वंचित असलेली अनेक कुटुंबे आहेत. लिंगभेद, आर्थिक विषमता, सामाजिक अन्याय हे प्रश्न अजूनही डोके वर काढत आहेत. अशा परिस्थितीत 'कमवा आणि शिका' ही योजना नव्या स्वरूपात राबविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच स्वावलंबन, कष्टाची तयारी आणि समाजसेवा या मूल्यांना जपले पाहिजे. तंत्रज्ञानाच्या या युगात भाऊराव पाटील यांचा संदेश तितकाच लागू पडतो.

कर्मवीर भाऊराव पाटील हे नाव उच्चारले की डोळ्यांसमोर एक साधा, कष्टाळू, ध्येयवेडा आणि समाजासाठी जिवाची बाजी लावणारा माणूस उभा राहतो. त्यांनी राजकीय पदांची मोहिनी पत्करली नाही, संपत्ती जमवली नाही, परंतु सामान्य माणसाच्या जीवनात बदल घडविण्यासाठी आयुष्य खर्च केले. त्यांच्या शैक्षणिक चळवळीने लाखो घरांमध्ये ज्ञानदीप प्रज्वलित केला. त्यांच्या निधनानंतरही त्यांचे कार्य आजही तितक्याच जोमाने सुरू आहे. रयत शिक्षण संस्था आज ग्रामीण भागात शिक्षणाचा महासागर बनली आहे. या संस्थेच्या शाळा व महाविद्यालयांतून शिकलेली पिढी समाजाच्या विविध क्षेत्रांत आपले योगदान देत आहे. हे सारे भाऊराव पाटील यांच्या ध्येयवेडेपणाचे फलित आहे.

आज आपण त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करतो तेव्हा त्यांच्या कार्याचा केवळ गौरव न करता त्यांचे आदर्श आचरणात आणणे ही खरी त्यांना वाहिलेली आदरांजली ठरेल. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करून देणे, स्त्रीपुरुष समानतेवर भर देणे, श्रमाची प्रतिष्ठा जपणे आणि समाजातील विषमता दूर करणे या त्यांच्या संकल्पना आजही मार्गदर्शक ठरतात.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5@gmail.com

## प्रबोधन

# पुन्हा नाही जन्म । शेवटची संधी

संत कबीर हे जीवनवादी विचारवंत होते. जन्मभर त्यांनी हजारो, लाखो वस्त्रं विणून समाजाला दिली. इतर संतांच्या हातात दिसतात तशा चिपळ्या किंवा टाळ कबीरांच्या हातात दिसत नाहीत. म्हणूनच त्यांच्या उपदेशाला वजन आहे. एका ते दोह्यात म्हणतात, कल करे सो आज कर, आज करे सो अब । पल में प्रलय होएगी बहुरी करेगा कब ? । अर्थात, जे काही करायचं आहे, ते करायला सुरुवातच करा; उद्यावर ते ढकलू नका, उद्याचं काही खरं नाही. हुशार दुकानदार आज रोख उद्या उधार असं सांगून जशी रोकड जमा करतो, त्याप्रमाणे आपण प्रत्येक क्षण डिपॉझिट केला पाहिजे. आयुष्याचा उपयोग या गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी व्याख्याते नेहमी घटका गेली पळे गेली तास वाजे ठणाणा। आयुष्याचा नाश होतो राम का रे म्हणा ना।। असं सतत कानीकपाळी ओरडत ठणाणा करतात. एका सुभाषिताने वेळ घालवण्यावरून माणसांचे बुद्धिमान आणि मूर्ख असे दोन प्रकारच केलेत. सुभाषित म्हणतं, काव्यशास्त्र– विनोदेन कालो गच्छाति धीमताम्। व्यसनेन तु मूर्खार्नां निद्रया कलहेन वा ।। अर्थात काव्यशास्त्र – विनोदात वेळ घालवतात ते शहाणे असतात. आणि व्यसनीपणा, झोप किंवा भांडणात वेळ घालवतात, ते मूर्ख असतात.

'मी कसं जगावं ?' असा प्रश्न जिज्ञासूने आपल्या गुरूला विचारला. गुरू म्हणाला, 'फाशीची शिक्षा झालेल्या कैद्यासारखा जग!' या उपदेशात वेळेविषयीचं तीव्र भान आहे. फाशीचा दिवस निश्चित झाला, की उतरती मोजणी (Count down) सुरू होते. मग मात्र तासाला, अर्ध्या तासाला वाजणाऱ्या घंटेला खूप खूप अर्थ येतो. मिनिटा–मिनिटाने मृत्यू जवळ येत आहे, हे भान एकदा माणसाच्या मनात ठाण मांडून बसलं, की तो क्षणाक्षणाचा उपयोग करून ज्ञान तरी मिळवील किंवा कणाकणाचा संग्रह करून संपत्तीमान तरी होईल. क्षणशः कणश्चैव विद्यामर्थंच साधयेत असा त्याला कुणी उपदेश करण्याची गरजच मग उरणार नाही.

दुर्लभं मानुषं जन्म असं शास्त्रकारांनी बजावून ठेवलंय. दुर्लभ याचा अर्थ पुन्हा न मिळणारा! या वचनाने पुनरपि जननं पुनरपि मरणं ही आद्य शंकराचार्योक्ति खोटी आहे, हे स्पष्ट होतं. शाहीर रामजोशी यांनी म्हणूनच नरजन्मामधि नरा करून घे नर–नारायण गडी । तरीच हे सार्थक मानवकुडी असा योग्य उपदेश केला आहे. नामस्मरणात वेळ न घालवता सर्व शक्ती एकवटून काम करा, तरच आयुष्याचं सार्थक होईल, असं ते तेवढ्यासाठीच म्हणतात. पुराणकारांच्या 'चौऱ्याऐंशी लाख जन्मांनंतर मनुष्यजन्म मिळतो,' या अतिशयोक्तीचा अर्थ जीव अनेक योनीतून फिरतो असा नसून; तो दुर्लभ आहे, एवढाच आहे.

आर्य चाणक्याने 'कौटिल्यिय अर्थशास्त्र' ग्रंथात राजाला विष्णुसहस्त्रनामजप, रामरक्षा, मृत्युंजय जप आदि कर्मे करायला सांगितलेली नसून राजाने पहाटे तीन वाजता उठून काल पाठवलेल्या हेरांकडून बातम्या घ्याव्यात, चार ते पाच नित्यकर्म, पाच ते सहा आजचे हेर कामं सांगून रवाना करणं, असा कालबद्ध राज्यकर्मविधी दिला आहे. रामशास्त्री प्रभुणे यांना वरील ग्रंथाची माहिती असेल. म्हणून तर त्यांनी थोरल्या माधवरावांनी देवपूजेत वेळ घालवल्याचा राग येऊन 'तुम्ही राज्यकारभार सोडून द्या, आपण दोघं काशी यात्रेलाच जाऊ या!' असं खडसावलं होतं. राजांचा वेळ हा राष्ट्रहिताचा वेळ असतो.

डॉ. आ. ह. साळुंखे लिहितात, 'उपनिषद म्हटलं की आत्मा, परमात्मा, ब्रह्म, मोक्ष या संकल्पना मनात येतात. पण ईशावास्योपनिषदात कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समाः असे वेगळं वचन आहे. या जगात कर्म (कामं) करीतच शंभर वर्षं जगण्याची इच्छा बाळगावी असा त्याचा अर्थ आहे. इथे कर्म म्हणजे धर्मशास्त्राने सांगितलेलं विशिष्ट कर्मकांड, असा मर्यादित अर्थ न घेता आपलं आयुष्य आनंदाने घालवण्यासाठी प्रयत्न करणं, असा घेतला, तरच जन्माचं सोनं होईल.' तेव्हा–

आयुष्य आपुले। पृथ्वीच्या मोलाचे
करा सोने त्याचे । उठा उठा ॥१
तुम्हाला लाभली । संधी ही अमोल
क्षण बहुमोल । एक एक ॥२
जगण्याचे क्षण । कारणी लावावे
सर्वांचेच व्हावे । हित साध्य ॥ ३
केल्याने होतसे । स्वर्ग या जगाचा
जपून वेळेचा । करा खर्च ॥४
पुन्हा नाही जन्म` शेवटची संधी
सुज्ञ तोचि साधी । बिनचूक ॥५
कामामध्ये जातो। तोच वेळ खरा
त्याविण दुसरा । सर्व व्यर्थ ॥६
कष्टाचा आनंद। भजनात नाही
सौख्य खरे नाही । भक्तीमध्ये ॥ ७
अध्यात्माचा रंग । जेवढा फासाल
बेरंगी होईल । जीवन ते ॥ ८
आयुष्य काही ते स्वतःसाठी जगा
जगासाठी जगा। राहिलेले ॥ ९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# लोकमंगल कृषी महाविद्यालया मार्फत कौठाळी विद्यालयात कृषी पर्यटन व्याख्यान आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथील राष्ट्रीय सेवा योजना एककामार्फत पर्यटन दिनाचे औचित्य साधून कृषी पर्यटन या विषयावरील व्याख्यान कौठाळी विद्यालय, कौठाळी तालुका उत्तर सोलापूर येथे दिनांक २० सप्टेंबर रोजी संपन्न झाले. सदरील मार्गदर्शन व्याख्यानास प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे हे लाभले होते. कौठाळी विद्यालयातील वरिष्ठ शिक्षक श्री. शिरसट सर यांनी प्रास्ताविका मधून विद्यार्थ्यांना लोकमंगल शैक्षणिक समूहाच्या समृद्ध गाव योजना आणि अन्नपूर्णा योजना याविषयी माहिती दिली. प्रा. अजित कुरे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा. आ. श्री. सुभाष देशमुख यांच्या संकल्पनेतून सोलापूर जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या दिनांक २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीतील पर्यटन सप्ताहाबाबत माहिती दिली. याच पर्यटन सप्ताहाचे औचित्य साधून विद्यालयातील इयत्ता दहावी मधील विद्यार्थ्यांकरिता कृषी पर्यटन या विषयावरील व्याख्यान संपन्न झाले. व्याख्यानामध्ये प्रामुख्याने कृषी क्षेत्राशी निगडित व्यावसायिक पर्यटन संकल्पना विद्यार्थ्यांना उलगडून सांगण्यात आली. पारंपारिक शेती समवेत उत्पन्नाचे पयार्यी साधन म्हणून भविष्यात कृषी पर्यटनाचे असणारे महत्त्व या व्याख्याना द्वारे विद्यार्थ्यांमध्ये जागृत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देखील प्रश्नोत्तराच्या माध्यमातून कृषी पर्यटनाबाबतीत जिज्ञासु वृत्तीने माहिती जाणून घेतली. व्याख्यान आयोजनासोबतच लोकमंगल कृषी महाविद्यालयातील रासेयो एककातील स्वयंसेवकांनी शालेय विद्यार्थ्यांसमोर अक्षय ऊर्जा आधारित मॉडेल्सचे सादरीकरण केले. महाविद्यालया द्वारे राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमास शालेय विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुरवसे सर व शालेय समितीद्वारे लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले आणि अन्नपूर्णा योजनेत एक मूठभर धान्य ही संकल्पना शाळेत राबविण्याचा संकल्प देखील करण्यात आला. सदरील उपक्रमांच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षातील रासेयो स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# गावाच्या विकासासाठी व्यवसायिकांना कर्ज पुरवठा : चेअरमन राजेश चंकेश्वरा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** नातेपुते शहराची बाजारपेठ मोठी असल्याने नातेपुते परिसरातील अनेक खेडोपाडीचे आर्थिक व्यवहार नातेपुते शहराच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होतात. चंद्रप्रभू ही पतसंस्था नेहमीच सामाजिक बांधिलकी व ग्राहकाचे हित जोपासत आली आहे. गावाच्या विकासासाठी अनेक छोट्या मोठ्या व्यवसायिकांना कर्ज उपलब्ध करून व्यवसाय करण्याची संधी दिली.

सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य असल्यामुळे ऑडिट वर्ग ( अ ) असुन पतसंस्थेत १५ कोटी १७ लाखाच्या ठेवी, कर्जवाटप ११ कोटी ५० लाख, गुंतवणूक १२ कोटी ७८ लाख, भाग भांडवल ३६ लाख ३१ हजार असुन पतसंस्थेची नेत्रदीप प्रगती असल्याचे मत पतसंस्थेचे चेअरमन राजेश चंकेश्वरा यांनी व्यक्त करून.



चांगल्या कर्जदारांमुळे संस्था स्थापनेपासून आदर्श दर्जा राखून नफ्याने व आर्थिक शिस्तीने एक नंबरची संस्था व संस्थेत स्थापनेपासून राजकारणाचा हस्तक्षेप नसल्याने कर्जदार चांगले आहेत वेळेवर पैसे भरतात. शहरात निकोप स्पर्धा असल्याने प्रत्येक पतसंस्था चांगली चालत आहे.

**– मा. आ. रामहरी रुपनवर**

स्थापनेपासून राज्यातील आर्थिक शिस्त असलेली प्रमुख संस्था असल्यामुळे संस्थेला चिंता नाही. संस्थेचा आदर इतर पतसंस्थेने घेणे गरजेचे आहे. कार्यक्षम संचालक मंडळ असल्यामुळे आर्थिक शिस्त असणारी चंद्रप्रभू पतसंस्था म्हणून नावलौकिक आहे.

**– बाबाराजे देशमुख (मा. सोलापूर जि.प. उपाध्यक्ष )**

सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर केला. ते नातेपुते येथील चंद्रप्रभू पतसंस्थेच्या २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेवेळी बोलत होते.

यावेळी माजी आ. रामहरी रुपनवर, सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बाहुबली चंकेश्वरा, अर्जुन जठार, नगरसेवक अविनाश दोशी, उद्योजक अतुल बावकर, महेश शेटे, अमृतलाल गांधी, चेअरमन राजेश चंकेश्वरा, व्हा. चेअरमन अतुल गांधी, संचालक अनिलकुमार दोशी, ॲड. राजेंद्रकुमार गांधी, रवींदु डुडू, महावीर गांधी, मनोज दावडा, सुरेंद्र दावडा, माणिक बरडकर, वैभव दोशी, विनोद दोशी, सुरेश दोशी, शितलकुमार देसाई, जितेंद्र दोशी, सुकुमार दोशी, सुभाष दोशी, पि. के. सावंत, विजयकुमार गांधी, शर्मिला चांगण, अरविंद डुडू, राहुल गांधी, सुदर्शन दावडा, वज्रकुमार चंकेश्वरा, नीलकुमार गांधी, पतसंस्थेच्या सचिव वैशाली बंदिष्ठे, उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सभेचा सुरूवात भगवान चंद्रप्रभू यांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. सभेच्या अंदाजपत्रकाचे वाचन संचालक विनोद दोशी यांनी केले.विषय वाचन वसुली अधिकारी अजय कुलकर्णी यांनी तर अध्यक्षीय निवड सुरेंद्र दावडा यांनी व ताळेबंद वाचन महावीर गांधी यांनी केले. सभेचे सूत्रसंचालन निवेदक संदिप जाधव यांनी केले तर आभार अतुल गांधी यांनी मानले.यावेळी सभेसाठी व्यापारी वर्ग, संचालक मंडळ, सभासद, ठेवीदार, कर्जदार, पतसंस्थेचे कर्मचारी व पिग्मी एजंट, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

## वात्रटिका

### स्वप्नात येते खुर्ची

तुम्ही फक्त आवाज द्या
आम्ही धावत धावत येऊ...
गरज असेल तर मुंबई सोडू
आणि दिल्लीत सुद्धा राहू..`
पुन्हा येईन म्हणालो आणि
मी खरंच पुन्हा आलो...
स्वप्नात येते दिल्लीची वाट
आणि वाटते पंतप्रधान झालो...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मंगळवेढा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** अतिवृष्टीमुळे सोलापूर लोकसभा मतदारसंघातील मंगळवेढा तालुक्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

कांदा, तूर, ऊस, कापूस, बाजरी, मूग यांसारखी पिके पाण्याखाली जाऊन शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, सरसकट पंचनामे करावेत, कर्जमाफी जाहीर करून तातडीची मदत उपलब्ध करून द्यावी, तसेच बियाणे-खते अनुदान देऊन शेतकऱ्यांना उभारी द्यावी या मागण्यांसाठी खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवेढा तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष प्रशांत साळे यांच्या नेतृत्वाखाली नुकसानग्रस्त शेतामध्ये उभारून आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात तालुका काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शासनाने तातडीने निर्णय घेऊन मदत न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे सर, प्रदेश सचिव रविकिरण कोळेकर, शहराध्यक्ष राहुल घुले, दामाजी कारखान्याचे माजी चेअरमन शशिकांत बुगडे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे श्रीमंत केदार, दुर्योधन पुजारी व शेतकरी उपस्थित होते.

# स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानास महिलांचा उस्फूर्त प्रतिसाद -किसन जाधव




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधून तसेच महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या वतीनं स्वस्थ नारी सशक्त परिवार या पंधरवाडा अभियानाचे आयोजन संपूर्ण राज्यभर करण्यात आले आहे. दरम्यान याच अभियानाचा एक भाग म्हणून सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ येथील रामवाडी आरोग्य केंद्र येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड,ईच्छा भगवंताची मित्र परिवार आणि सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या सहकार्याने महिलांसाठी विविध वैद्यकीय मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यात रक्तदाब, मधुमेह, प्रसुतीपूर्व तपासणी, क्षयरोग, दंत तपासणी, अशा अन्य विविध तपासण्यांचा समावेश आहे तज्ञ डॉक्टरांकडून महिलांची तपासणी होऊन मोफत औषधोपचार देखील देण्यात आले महिलांच्या आरोग्याची तपासणी जनजागृती आणि पोषण सेवांचा प्रसार करणे तसेच केंद्र सरकार आणि राज्य सरकार तर्फे महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी स्वस्थ नारी सशक्त नारी परिवार अभियानाचे आयोजन करण्यात आले असून या अभियानास प्रभाग क्रमांक २२ येथील महिला भगिनींनी उस्फूर्त प्रतिसाद दिला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला आहे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार सदर अभियान राबविण्यात आला आहे असे यावेळी या अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी किसन जाधव म्हणाले. प्रारंभी या अभियानाचे शुभारंभ सोलापूर महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, वैद्यकीय अधिकारी क्षिप्रा पिंजरकर, डॉ. प्रतीक्षा गायकवाड, डॉ. गीता गावडे, डॉ.वैशाली मसवेकर, डॉ. अंजली आवटे, डॉ. सुधा फडके, डॉ. पूजा शेंडगे, डॉ. श्रुतिका खडतरे, एएनएम रेखा गायकवाड, पुनम जाधव, वनमला शिंदे, विजया कांबळे, पूजा राठोड, स्वाती कोळी, स्वप्नाली मोरे, सरिता पावरा, ललिता पावरा, सरिता लोखंडे, निकिता जंगम, अश्विनी कोळी, विजय बोड्डू, क्षयरोग विभागाचे रुपेश गायकवाड, श्रीपाद नारायणकर यांच्यासह प्रभागातील महिला भगिनींच्या उपस्थितीत करण्यात आले. स्वस्थ नारी सशक्त परिवार या अभियानास प्रभाग क्रमांक २२ मधून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करत बैलपोळा सण साजरा



**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):–** करमाळा तालुक्याच्या पच्छिम भागात भाद्रपद (भादवी) बैलपोळा सण साजरा करण्याचा मुहूर्त असून हा पारंपरिक सण मोठ्या उत्साहात बैलांची विधिवत पूजा करत गोड पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घालत त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करत करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नवनाथ झोळ यांच्या शेतामध्ये बैलपोळा साजरा केला. हा सण शेती संस्कृतीचा अविभाज्य भाग असून, बैलांच्या मेहनतीला सलाम ठोकण्याचा हा सोहळा, यादिवशी त्यांना स्वच्छ धुऊन,खांदा मळणी केली जाते. शिंगावरती बेगड लावून,अंगावरती झुल घातली जाते. गळ्यात माळा,रंगबेरंगी अशा प्रकारे बैलांना सजवून पुजा केली जाते. हा सण निसगार्शी आणि प्राण्यांशी असलेल्या मानवी नात्याला बळकटी देतो.

"कष्टाशिवाय मातीला... आणि बैलाशिवाय शेतीला..." आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या ट्रक्टर युगामध्ये सोशल मीडिया वरून बैलपोळ्याच्या शुभेच्छा देणारा संदेश दिला जातो. पण आधुनिक युगातही बैल पोळा हा सण आपल्या मुळांशी जोडून ठेवतो आणि शेतीच्या महत्त्वाची आठवण करून देवून संस्कृती कायम जिवंत ठेवतो.असे मत दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामदास झोळ व्यक्त केले.

# पी. एम. श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'सर्वकष लैंगिकता शिक्षण कार्यशाळा' संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** आजच्या काळात किशोरवयीन मुलांसमोर शारीरिक, मानसिक व सामाजिक अशा विविध आव्हानांचा सामना करण्याची वेळ येते. अशा वेळी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे अत्यावश्यक आहे. याच उद्देशाने पी. एम. श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, एम. आय. डी. सी. चिंचोलीकाटी येथे प्रिसिजन फाउंडेशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (एफपीआय), सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय ह्यसर्वकष लैंगिकता शिक्षण कार्यशाळाह्ल आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना किशोरावस्था, वैयक्तिक स्वच्छता, आहार, एचआयव्ही/एड्स, मासिक पाळी, कॅन्सर, जीवनकौशल्ये, बालशोषण प्रतिबंध तसेच गुड टच-बॅड टच यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमासाठी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, सहायक जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे, एफपीआयचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, अध्यक्ष प्रा. डॉ. एन. बी. तेली व शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा पार पडली.

यावेळी एफपीआयचे कार्यक्रम अधिकारी विरेंद्र परदेशी, स्वप्निल सोनवणे, सत्यभामा कांबळे, उर्मिला बनसोडे व विकी शिवशरण यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच चाईल्ड लाईन 1098 याविषयी सखोल माहिती चाईल्ड लाईनचे अनोज कदम यांनी विद्यार्थ्यांना दिली.

कार्यशाळेदरम्यान सापशिडीचा खेळ व प्रश्नोत्तर सत्रांमधून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला व आपल्या शंका दूर केल्या. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची मोफत हिमोग्लोबिन तपासणीही करण्यात आली.

या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक हबीब नवाज पाटील, मनोज सुधाकर ठोंबरे, राजन सूर्यभान ढवण, शशिकला प्रभाकर कुंभार, गीता महेशकुमार म्हेत्रे, दीपक अनिल गावडे, बापूराव पोपट येजगार, पवित्रा सिद्धाराम मदने व अन्य कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना जीवनासाठी आवश्यक ज्ञान, योग्य दृष्टीकोन व आत्मविश्वास मिळाल्याचे समाधान आयोजकांनी व्यक्त केले.

# प्रभाग 26 मधील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नगरातील समस्या सोडवा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** गेल्या तीन चार दिवसापासून सोलापूर शहर जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले असून त्यामुळे प्रभाग क्रमांक 26 मधील सखल भागातील द्वारका नगर, परमेश्वर नगर,कल्याण नगर भाग 2, हेरिटेज फॉर्म,गुरुदेव दत्त नगर, रत्नमंजिरी नगर,प्रिसिजन कॉलनी, पाटलीपुत्र नगर, बँक कॉलनी, राऊत वस्ती, कोरे वस्ती, स्वामी विवेकानंद नगर, ओम गर्जना चौक, अशा अनेक नगरात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात आल्यामुळे ड्रेनेज लाईन तुंबल्यामुळे सर्वत्र दुर्गंधीयुक्त पाणी पसरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून त्यामुळे मलेरिया, डेंग्यू, हिवतापाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले असून व तसेच अनेक नगरातील घरात अद्यापही पाणी थांबून आहेत त्यामुळे अनेक नागरिक घर सोडून स्थलांतरित झाले आहेत तरी तात्काळ तेथील समस्याचे निराकरण करण्यासाठी सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांना लेखी निवेदन दिले असून निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की,

सदर नगरातील थांबलेले पाणी लवकरात लवकर निचरा करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करणे.

पाणी थांबल्यामुळे मलेरिया,डेंगू सदृश्य आजार होत आहेत त्यासाठी प्रत्येक घरात निर्जंतुक फवारणी करणे.

नगरात पाणी आल्यामुळे डांबरी व काँक्रीट रस्ते फोडलेले असून ते परत आहे त्या स्थितीत करून देणे.

बाधीत नगरात अनेक इलेक्ट्रिक पोल असून त्यावरच्या एलईडी लाईट बंद आहेत ते तात्काळ चालू करून देणे.

सदर नगरात प्रत्येक पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने घराघरात पाणी शिरते त्याचा कायमचा बंदोबस्त करणे त्यासाठी 18 इंची ड्रेनेजची लाईन टाकणे.

घरातले घुसलेले दुर्गंधीयुक्त पाणी उपसा करण्यासाठी इलेक्ट्रिक मोटारची संख्या वाढवून ती तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी. अशा विविध समस्या तात्काळ दूर करण्यासाठी प्रत्येक संबंधित विभागास आदेश द्यावेत अशी मागणी भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांनी सोलापूर महापालिका आयुक्त डॉ.श्री सचिन ओंबासे साहेब यांना लेखी निवेदन देण्यात आले.

त्याप्रसंगी रुद्रया हिरेमठ काका,वाळवेकर सर, देव मॅडम, आमोणे सर, समर्थ जाधव, आरोळे सर, कोळी साहेब, वंदना वाळवेकर, सुजाता मोडके, रेशमा अमोने, मोहन पाटील, तेजश्री पाटील,सुनीता हिरेमठ, शर्मिला हुल्ले, उमेश चांडोले,

आर्या हेरिटेज फॉर्मचे चेअरमन सुजित कोरे सर, सोमनाथ स्वामी, महारुद्र खुरपे, द्वारका नगर मधील अंबादास कोकरे सर,शिवगणे सर, मंगल लोंढे, ज्योती म्हेतरे,जगदेवी म्हेत्रे, अर्चना कोकरे, माधुरी गायकवाड, संगीता कोळी,शरणामा गवळी, पुजा पारधे, सुवर्णा तळभडारे, वर्षा मरडे, श्रीदेवी पुजारी.पाटलीपुत्र नगर मधुन सौ.शिवगगा जाधव, निलंगगा सोनकांबळे, कांबळे मावशी, तसेच बाधित नगरातील असंख्य महिला वर्ग ज्येष्ठ नागरिक तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते व आपल्या नरकयातना समस्या सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांना समक्ष सांगितल्या.

# तलाठी असो की कलेक्टर'. कोणी किती काम केले, आता तपासणार



**मुबंई (कटूसत्य वृत्त):–** महसूल विभागाच्या ऑनलाईन कामकाजावर सतत लक्ष ठेवण्यासाठी डिजिटल डॅशबोर्ड तयार करण्यात आला आहे. यातून महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या कामांचा आढावा मिळणार आहे. राज्य सरकारचे हे महत्वाकांक्षी पाऊल ठरणार आहे. डिजिटल डॅशबोर्ड माध्यमातुन जिल्हाधिकारी कार्यालयापासून ते गावापातळीवरील कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांचेच कामकाज दिसणार आहे. महसूल विभागाच्या विविध सेवा तातडीने आणि पारदर्शक पद्धतीने देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.या निर्णयामुळे आता जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार,नायब तहसीलदार, मंडळाधिकारी, तलाठी, लिपिक अशा सर्व पदांवरील अधिकारी - कर्मचाऱ्यांचे कामकाज थेट शासनाच्या रडारवर राहणार आहे. त्यामुळे पारदर्शकता वाढणार आहे.

दप्तरी तपासणी म्हणजे काय?

दप्तरी तपासणी म्हणजे महसूल कार्यालयात विविध प्रकरणाचा तपास, प्रकरणे किती निपटली आणि किती प्रलंबित आहेत. हे पाहण्याची पद्धत आहे, यामुळे कामाचा वेग आणि दर्जा कसा आहे ते समजले.

**डॅशबोर्डवर सर्व माहिती उपलब्ध होणार**

या नव्या प्रणालीमुळे दप्तरी तपासणीबद्दल एक क्वीलकवर डॅशबोर्डवर माहिती उपलब्ध होणार आहे. या ठिकाणी कोणत्या अधिकऱ्यांने किती काम केले याची माहिती मिळेल यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना कामकाजाची गती काय आहे हे तपासता येईल. कामकाजात दिरंगाई झाल्यास कारणे कळतील. फाईल प्रलंबित का आहे, याची स्पष्टीकरणही मिळणार आहे. दिरंगाई आणि बेफिकीरीवर बसणार चाप महसूल विभागाच्या ऑनलाईन कामकाजामुळे दिरंगाई टळणार.

अधिकाऱ्यांनी किती काम प्रलंबित ठेवले आहे, हे कळणार आहे. नागरिकांना सेवा वेळेत मिळण्यासाठी मदत होणार.

**संगणकीकरणानंतर वाढला होता गोंधळ**

संगणकीकरणानंतर महसूल विभागाच्या कामकाजात गोंधळ वाढला होता, मात्र यामुळे कामकाजाचा वेग वाढेल असे महसूल विभागाचे म्हणणे आहे, विविध पातळ्यावंर कामाचा आढाव घेता येणार, असल्याने तक्रारी कमी होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**नवी प्रणाली सर्वांना बंधनकारक ठरणार.**

या नव्याप्रणालीमुळे तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांचेही कामकाज तपासले जाणार आहे. त्यामुळे कुणीही निष्क्रिय राहणार नाही.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून नवरात्र महोत्सवानिमित्त 'मृत्युंजय' सजीव हलता देखावा




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने यंदाही श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव -२०२५ चे आयोजन करण्यात आले असून, सोमवार दि. २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वा. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील मृत्युंजय सजीव हलता देखावा उद्घाटन सोहळा आमदार सचिन कल्याणशट्टी यांच्या व मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असल्याची माहिती न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी दिली आहे. या पत्रकार परिषदेस न्यासाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे आदिजनं उपस्थित होते.

दरम्यान श्री तुळजाभवानी माता मंदिरात महापूजा, आरती मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम हा विरक्त मठ अक्कलकोटचे श्री म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मुख्य पुरोहित मोहन पुजारी, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे प.पु. वे.शा.स. अण्णू पुजारी व प.पु. धनंजय महाराज पुजारी, यांच्या दिव्य सानिध्यात तर श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, हृदयरोग तज्ञ डॉ. सत्यशाम तोष्णीवाल, न्यासाचे कायदेविषयक सल्लागार व जेष्ठ विधीज्ञ ॲड. नितीन हबीब, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, न्यासाचे सनदी लेखापाल ओंकारेश्वर उटगे, न्यासाचे कायदेविषयक सल्लागार व विधीज्ञ ॲड. संतोष खोबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. सदरचा कार्यक्रम हा अन्नछत्र मंडळाच्या परिसरात असलेल्या श्री तुळजाभवानी मंदिराच्या प्रांगणात होणार आहे. या कार्यक्रमास समस्त विश्वस्त मंडळ, क्रियाशील सदस्य, कार्यकर्ते, व सेवेकरी अन्नछत्र मंडळ, हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था, अमोलराजे भोसले मित्र मंडळ, यांचे सहकार्य लाभणार आहे.

सदर देखावा हा घटस्थापने पासून ते विजयादशमी पर्यंत सर्व देवी भक्त व शहर वाशीयांसाठी असणार आहे. तरी सर्वांनी या संधीचा लाभ घ्यावेत असे आवाहन संस्थेचे सचिव शामराव मोरे यांनी केले आहेत.

# सांगोल्यात नवरात्रोत्सव काळात दांडिया गरबा नाईट-२०२५ चे आयोजन



**सांगोला (कटूसत्य वृत्त):–** छ. शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळ, छ. शिवाजीनगर, सांगोला व जोतिर्लिंग प्रतिष्ठान संचलित, जोतिर्लिंग प्रतिष्ठान यांच्या वतीने दांडिया गरबा नाईट-२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते, तर सोनिया जयकुमार गोरे, माजी जिल्हा परिषद सदस्या जिजामाला रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. २३ ते २५ सप्टेंबर दरम्यान सायं. ५ ते रात्री १० पर्यंत चेतनसिंह (बाळासाहेब) केदार-सावंत मित्रपरिवार सांगोला तालुका यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले आहे. दांडिया गरबा नाईट-२०२५ या कार्यक्रमात प्रथम दिवस लकी ड्रॉ ७ पैठणी साड्या माजी नगरसेवक आनंदा (भाऊ) माने यांच्यावतीने, दुसरा दिवस लकी ड्रॉ 7 पैठणी साड्या सौजन्य उत्तम गायकवाड, योगेश भगत यांच्या वतीने, तिसरा दिवस लकी ड्रॉ ७ पैठणी साड्या सौजन्य तनु थोरात मेकअप स्टुडिओ आणि रेन्टल हाऊस यांच्या वतीने देण्यात येणार आहेत. सर्वोत्कृष्ट दांडिया जोडी रु. ७००१/- व ट्रॉफी प्रताप (बाबासाहेब) देशमुख (नेते स्वाभिमानी शेतकरी संघटना) यांच्या वतीने, सर्वोत्कृष्ट गरबा जोडी रु. ७००१/- व ट्रॉफी किशोर कृष्णा म्हमाणे (संपादक, दै. किर्णोदय सांगोला) यांच्या वतीने, सर्वोत्कृष्ट महिला दांडिया ग्रुप रु. ७००१/- व ट्रॉफी सुयोग दिवटे (लझीज पिज्झा) यांच्या वतीने, सर्वोत्कृष्ट महिला गरबा ग्रुप रु. ७००१/- व ट्रॉफी स्वातीताई मगर (मा. उपनगराध्यक्ष) यांच्या वतीने, सर्वोत्कृष्ट वेशभुषा रु. ७००१/- व ट्रॉफी एस. के. टेक्स्टाईल होलसेल साडी डेपो यांच्या वतीने, सर्वोत्कृष्ट मुली दांडिया ग्रुप रु. ७००१/- व ट्रॉफी आय लव सांगोला (अभिराज माकेटींग टीम) यांच्या वतीने, सर्वोत्कृष्ट मुली गरबा ग्रुप रु. ७००१/- व ट्रॉफी नवनाथ केदार (हॉटेल संगम कमलापूर ता. सांगोला) यांच्या वतीने बक्षिसे देण्यात येणार आहेत. ट्रॉफी एस एस ट्रॅव्हल्स यांच्या वतीने देण्यात येणार आहे. माडगुळकर ज्वेलर्स यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. या कार्यक्रमासाठी जोतिलिंग फ्रूट सप्लायर्स & ट्रान्सपोर्टर्स, श्रीनाथ स्टोन क्रेशर & ज्योतीस्मती क्रिएशन्स, महालक्ष्मी कलर जंबो झेरॉक्स, नाथबाबा मंगल भांडार & केटरर्स नाथबाबा डेकोरेटर्स, अनघादत्त इंजिनिअर्स & डेव्हलपर्स सांगोला, आनंद मंडप, सांगोला, हॉटेल गोल्डन लिफ वाढेगाव नाका, सांगोला, अफजल शेख पुणे, नितीन सावंत साहेब, वाढेगांव यांचे सहकार्य लाभले आहे. अधिक माहितीसाठी सौ. सुजाता केदार-सावंत 8888881010, माधुरी जाधव 9689716801, ज्योती महांकाळ 9604604145, स्वाती मगर 9404666502, राणी पवार 9604611158, तनु थोरात मिसाळ 9096889429, रतन मोहिते 7620123254, शोभा देशमुख 9960156696, योगिता शिंदे 9404280003 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन सहयोगाने केले आहे.

सदरचा कार्यक्रम न्यू इंग्लिश स्कूल ग्राऊंड, सांगोला येथे २३ ते २५ सप्टेंबर दरम्यान वेळ सायं. ५ ते रात्री १० पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. सदरचा कार्यक्रम फक्त महिलांसाठी असून सांगोला तालुक्यातील सर्व महिलांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

या कार्यक्रमासाठी सिंगर संजू राठोड, बिग बॉस फेम जानवी किल्लेकर, सिनेअभिनेत्री अभिज्ञा भावे, सेलिब्रिटी अँकर आर जे अक्षय, प्रसिद्ध रिल्स स्टार वैभव गावडे, मिस ग्लॅमर ऑफ महाराष्ट्र समृद्धी खडतरे, ऑपरेटर डीजे गणेश, निवेदक चंद्रकांत कोकाटे, निवेदिका माधुरी जाधव उपस्थित राहणार आहेत.

# प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने साठ हजार वह्यांचे वाटप



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्ह्याचे माजी विधानपरिषद आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या साठाव्या वाढदिवसाच्या औचित्याने पंढरपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक गणेशभाऊ अधटराव व नवशक्ती सामाजिक संघटना सह्याद्री नगर इसबावी यांच्या वतीने पंढरपूर शहरातील सर्व शाळांमधिल शालेय विद्यार्थ्यांसाठी साठ हजार वह्यांचे वाटप करण्यात आले प्रशांतराव परिचारक यांच्या सामाजिक उपक्रमांवर भर देण्याच्या आव्हानाला प्रतिसाद देत प्रतिवर्षी गणेशभाऊ अधटराव हे परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवत असल्याचे या अगोदरही दिसून आले आहे त्यांनी या अगोदरही नवशक्ती सामाजिक संघटनेच्या माध्यमातून परिचारक यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने वृक्षारोपण...आरोग्य व रक्तदान शिबिर असेल गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप महिलांसाठीचे गृहउपोयोगी वस्तुंच्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन असे आधी विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत स्वतः प्रशांतराव परिचारक यांनी त्यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांच्या हितचिंतकांनी वायफळ खर्च न करता समाज हितोपयोगी कार्य करण्याचे आवाहन त्यांनी त्यांच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना केले होते त्या पार्श्वभूमीवर गणेशभाऊ अधटराव यांच्या वतीने साठ हजार वह्यांचे वाटप पंढरपूर शहरातील सर्व शाळांमध्ये करण्यात आले.

# मांडवे येथे एका इसमाकडून देशी बनावटीचे गावठी पिस्तूल जप्त



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** खंडाळी तालुका माळशिरस येथील व्यक्ती अनिकेत महादेव पडसळकर याच्या कडून, मांडवे तालुका माळशिरस येथे देशी बनावटीचे गावठी पिस्तूल जप्त करण्यात आले असून, तालुक्यात खळबळ उडाली आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, अनिकेत महादेव पडसळकर, रा. खंडाळी, ता. माळशिरस हा व्यक्ती स्वतःजवळ, अवैधरीत्या विनापरवाना गावठी पिस्तूल कमरेला बाळगून फिरत असल्याचे समजले. सदर माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अकलूज विभागाच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तत्काळ कारवाई केली.

दिनांक 20/09/2025 रोजी पहाटे 03.25 वाजता मौजे मांडवे, ता. माळशिरस येथे सदर इसमास पकडण्यात आले. तपासणीदरम्यान आरोपीकडून देशी बनावटीचे गावठी पिस्तूल जप्त करण्यात आले. या प्रकरणात नातेपुते पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदवून आरोपीस अटक करण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज संतोष वाळके व स.पो.नि. संदीप गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.कारवाईत उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अकलूज विभागाच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील एएसआय श्रीकांत निकम, पोलीस नाईक राकेश लोहार, व पोलीस नाईक दत्ता खरात यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ५७/२०२५ नि.६

**माढा येथील सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हिजन सो. माढा यांचे न्यायालयात**

श्रीमती. पुष्पा रघुनाथ रामदासी } **अर्जदार**

**विरुध्द**

कोणी नाही } **सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मोजे अकलूज, ता माळिशरस, जि. सोलापूर येथील लोकांना कळिवणेत येते की, ज्याअर्थी या जाहीरनाम्याने कळिवण्यात येते की, वरील अर्जदार यांचे मयत नामे कै. नवनाथ रघुनाथ रामदासी यांचा मृत्यू दि. ०३/०६/२०१९ रोजी यशवंतनगर अकलूज ता. माळिशरस येथे झाला असून त्यांचे मृत्यूनंतर यातील अर्जदार यांना मयत नवनाथ रघुनाथ रामदासी यांचे कायदेशीर वारसदार असलेबाबत व महसूल दप्तरी नाव नोंदविण्याकरिता गाव कामगार तलाठी चव्हाणवाडी (टे) कार्यालयातून वेळोवेळी मागणी होत असलेने अर्जदार हे मयत नवनाथ रघुनाथ रामदासी यांचे वारस आहेत असा दाखला मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने तमाम जनतेस कळिवण्यात येते की, सदर अर्जदार हे नवनाथ रघुनाथ रामदासी यांचे वारस असलेबबतचा वारस दाखला अर्जदार यांचे नावे देणेबाबत कोणी कायदेशीर वारस असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख ३०/१०/२०२५ रोजी स्वतः अथवा विधिज्ञामार्फत या न्यायालयात हजार राहून हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे अर्जदाराचा पुरावा घेवून पुढील योग्य ते आदेश पारित केले जातील. तद्नंतर कोणाची काही एक तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. हि जाहीर प्रसिद्धीकरण केले असे. दि. १९/९/२०२५

**हुकूमावरुन**

**क.लिपीक** (शिक्का) **सहा अधिक्षक दि.न्यायालय क.स्तर,माढा**